**<u>ठळक बातम्या</u>**

- ऑस्ट्रेलिया आणि भारताच्या संरक्षण सहकार्याविषयीचं संयुक्त निवेदन जारी

- राज्यात समान नागरी कायदा तयार करण्यासाठी ७ जणांची समिती स्थापन केल्याची मुख्यमंत्र्याची विधानसभेत घोषणा

- अमेरिका - इराण संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या दरात ६ टक्के वाढ

**आणि**

- विम्बल्डन टेनिस स्पर्धेच्या कनिष्ठ गटात भारताच्या अर्णव पापरकर याची उपांत्य फेरीत धडक

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलियाची द्विपक्षीय भागीदारी भविष्यासाठीचं एक भक्कम नातं असून आर्थिक आणि व्यापारविषयक सहकार्याला मिळालेली गती हे या चर्चेचं यश असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बनीज यांनी दोन्ही देशांमधल्या संरक्षण सहकार्याबाबतचं संयुक्त निवेदन जारी केलं, त्यावेळी ते बोलत होते. ऑस्ट्रेलियात मेलबर्न इथे दोन्ही नेत्यांची आज बैठक झाली त्यानंतर हे निवेदन देण्यात आलं. भारत आणि ऑस्ट्रेलिया या देशांमधल्या सामायिक घटकांवर प्रधानमंत्री म्हणाले…

**- - होल्ड… बाईट - प्रधानमंत्री - -**

दोन्ही देशांमध्ये २०२२ साली झालेला आर्थिक आणि व्यापारी सहकार्य करार विक्रमी वेळेत लागू झाल्यानंतर भारतातून ऑस्ट्रेलियाला होणारी निर्यात दुप्पट झाल्याचं यावेळी मोदी यांनी सांगितलं. हिंद प्रशांत क्षेत्रात शांतता, स्थैर्य आणि प्रगती साध्य करण्यासाठी दोन्ही देशांमध्ये सहकार्य आवश्यक आहे असं प्रधानमंत्री मोदी यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने चालू आर्थिक वर्षासाठी भारताचा स्थूल राष्ट्रीय उत्पादनवाढीचा दर ७ टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यानुसार भारताची

अर्थव्यवस्था जगातली सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ठरली आहे. नाणेनिधीने काल जारी केलेला अर्धवार्षिक अहवाल- वर्ल्ड इकोनॉमिक आउटलुकमध्ये ही आकडेवारी दिली आहे. अहवालानुसार भारताची देशांतर्गत बाजारपेठ मजबूत असून सेवा क्षेत्राच्या गतिमान वाढीमुळे भारताला हा विकासदर गाठता आला आहे. भारताचा हा अंदाजित विकासदर जागतिक स्तरावरच्या अंदाजित विकासदराच्या दुपटीहून अधिक आहे. अहवालात जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाढीचा यावर्षीचा अंदाजित दर ३ टक्के दिला आहे.

**<><><><><>**

भारताच्या ब्रिक्स अध्यक्षतेअंतर्गत ब्रिक्स देशांच्या परिवहन मंत्र्यांच्या तिसऱ्या बैठकीचं उद्घाटन आज केंद्रीय परिवहन सचिव व्ही. उमाशंकर यांच्या हस्ते झालं.

उद्घाटनानंतर परिवहन कार्य गटाच्या एका सत्राला उमाशंकर यांनी संबंधोधित केलं. यावेळी पुनर्वापर, गतीशीलता, शहरी पायाभूत सुविधा, शाश्वत विकास या मुख्य मुद्द्यांवर तसंच परिवहन क्षेत्राशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान ब्रिक्स सदस्य देशांच्या परिवहन मंत्र्यांची मुख्य बैठक येत्या ११ आणि १२ जुलै रोजी होणार आहे. केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतील. दोन दिवस चालणाऱ्या या बैठकीत ब्रिक्स सदस्य देशांचे परिवहन मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी सहभागी होणार असून परिवहन, पायाभूत सुविधा आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे.

**<><><><><>**

राज्यात समान नागरी कायदा तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली ७ जणांची समिती स्थापन केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. या समितीने ६ महिन्यांत अहवाल द्यावा आणि नागपूर इथं होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात समान नागरी कायदा आणायचा प्रयत्न करू, असंही त्यांनी सांगितलं. या समितीत मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण, न्यायमूर्ती एस. जी. मेहरे, राज्याचे माजी मुख्य सचिव डी. के. जैन, मुख्य महाधिवक्ता वीरेंद्र सराफ, पद्मश्री आणि राज्यघटनेचे अभ्यासक रमेश पतंगे, शिक्षणतज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा रावल यांचाही या समितीत समावेश आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी किल्ले प्रतापगडाच्या पायथ्याशी अफझलखान भेटीच्या वेळी त्याचा अंगरक्षक

सय्यद बंडा याचा वार रोखून छत्रपतींचं रक्षण करणारे वीर जिवाजी महाले यांचं स्मारक उभारण्यासाठी पहिल्या टप्प्यात १ कोटी रुपये मंजूर केल्याची घोषणा मंत्री शंभुराज देसाई यांनी केली.

मुंबई उपनगरात खारफुटी असलेल्या ठिकाणी भराव टाकून राहणाऱ्यांचं सर्वेक्षण करू आणि १ जानेवारी २०११ पर्यंत तिथं राहणाऱ्यांचं पूर्ण पुनर्वसन करू, असं आश्वासन मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिलं.

'लोकराज्य' या सरकारच्या प्रकाशनात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो उलटा छापल्याचा, तसंच इतरही चुका असल्याचा मुद्दा नितीन राऊत यांनी उपस्थित केला. याची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करून गरज पडल्यास कारवाई करावी, अशी सूचना अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली. पण विरोधकांचं समाधान न झाल्याने त्यांनी हौद्यात उतरून घोषणाबाजी केली. त्यावर, या प्रकरणी २४ तासांत कारवाई करू, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं.

नाशिक जिल्ह्यात कुंभमेळ्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या रिंग रोडच्या आखणीत काहींना फायदा होण्यासाठी जाणूनबुजून बदल करण्यात आले का याची चौकशी उच्च स्तरावरून येत्या पंधरा दिवसांत करून त्याचा अहवाल तयार करण्यात येईल अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली. याबाबतचा प्रश्न विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला होता.

**<><><><><>**

कांद्यावर प्रक्रिया करून त्याची काही उत्पादने तयार करण्यावर सरकारने अभ्यास सुरू केला आहे. वर्षाला कांद्याला द्याव्या लागणाऱ्या अनुदानापेक्षा कमी खर्च यात होईल आणि शेतकऱ्यांना दीर्घकालीन फायदा येईल असं मंत्री जयकुमार रावल विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात म्हणाले. देशात इतर राज्यातही कांद्याचं उत्पादन सुरू झाल्याने मागणी पेक्षा जास्त कांदा उपलब्ध झाला आहे. यावर पर्याय म्हणून शेतकऱ्यांना इतर पिकाचा पर्याय सुचवता येईल का यावर अभ्यास सुरू आहे, असंही ते म्हणाले. नाफेड आणि NCCF च्या दरापेक्षा बाजार भाव जास्त असल्याने शेतकरी इतरांना कांदा विकत असल्याचं ते म्हणाले. राज्यातल्या ४८ साखर कारखान्यांकडे ऊस शेतकऱ्यांच्या रास्तभावाचे २९८ कोटी रुपये थकीत आहेत. ही रक्कम शेतकऱ्यांना मिळावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत आणि आवश्यक

तिथे व्याजासह ही रक्कम शेतकऱ्यांना दिली जाईल, असं मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. ही रक्कम शेतकऱ्यांना देण्यासाठी गरजेप्रमाणे एफआयआर केली असल्याचं ते म्हणाले. शेतकऱ्यांना अधिक दर मिळतो म्हणून शेतकरी दुसऱ्या कारखान्याला ऊस देतात, त्यामुळे झोन बंदी लागू करण्याचा विचार नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

पुणे जिल्ह्यात पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातल्या मोशी प्राधिकरण भागात काल कचऱ्याचा डोंगर इमारतीवर कोसळून झालेल्या अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. ढिगाऱ्याखाली १८ ते २३ व्यक्ती अडकल्याचा अंदाज होता, त्यातले पाचजण स्वतःच बाहेर पडले होते. त्यानंतर राष्ट्रीय आपत्ती निवारण दल, लष्कर, अग्निशमन दल आणि पोलीस इत्यादींच संयुक्त बचावकार्य सुरु आहे. आतापर्यंत एकूण १४ जणांना वाचवण्यात यश आलं असून काहीजण अद्याप ढिगाऱ्याखाली अडकल्याचा अंदाज आहे.

<><><><>

अमेरिका-इराण संघर्ष तीव्र झाल्याने जागतिक बाजारपेठांवर त्याचे पडसाद उमटले आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतचा युद्धविराम संपुष्टात आल्याचे म्हटले आहे. या घडामोडीनंतर ब्रेंट क्रूडच्या किमतीत सहा टक्क्यांहून अधिक वाढ होऊन प्रति बॅरल ७८ डॉलर्स ८० सेंटपर्यंत पोहोचले आहेत. तर अमेरिकन कच्च्या तेलाच्या दरातही वाढ होऊन ते प्रति बॅरल ७५ डॉलर पर्यंत गेले आहेत. तेलाच्या किमती वाढल्याने महागाई आणि जागतिक अर्थव्यवस्थेबाबतची चिंता पुन्हा वाढली आहे.

<><><><>

भारताचा १८ वर्षीय टेनिसपटू अर्णव पापरकर याने विम्बल्डन कनिष्ठ गटातल्या पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश करून इतिहास घडवला आहे. गेल्या ३६ वर्षात पुरुष एकेरी गटात इथवर पोचणारा तो भारताचा पहिला खेळाडू आहे. अर्णवने उपउपांत्य फेरीत जपानच्या रयो ताबाता याचा फक्त ५२ मिनिटांमध्ये ६-२, ६-१ असा पराभव केला. त्याआधी पहिल्या फेरीत त्याने ब्रिटनच्या जोशुआ क्रेज याला आणि दुसऱ्या फेरीत अमेरिकेच्या किटन हॅन्स यालाही दोन सेट मध्येच हरवलं होत. या स्पर्धेत अर्णवने आतापर्यंत एकही सेट गमावलेला नाही.

त्याचा पुढचा सामना आज संध्याकाळी ५ वाजता अमेरिकेच्या जॉर्डन ली याच्याबरोबर होणार आहे.

**<><><><><>**

नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या वतीने कवी कुसुमाग्रज राज्यस्तरीय विशाखा काव्य पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं. प्रथम पुरस्कार बुलढाण्याचे प्रेषित सिद्धभट्टी, द्वितीय पुरस्कार पनवेलच्या महानंदा मोहिते आणि तृतीय पुरस्कार बीडचे बाळासाहेब नागरगोजे यांच्या काव्य संग्रहांना प्रदान करण्यात आला.

**//<><><><><>//**